# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९११०२.
Email : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांकः२/एनजीसी/संकीर्ण-२/२०१६/२०८

दिनांक : 12 FEB 2016

प्रति,
मा. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठ,
महाराष्ट्र राज्य.

विषय : शाळेत व कॉलेज मधील मुले गैरहजर राहिल्याची माहिती मुलांच्या पालकांना मोबाईलवर एस.एम.एस. व्दारे देण्याबाबत

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण क्र. संकीर्ण-२०१६२२/१६/तांशि-५, दि.२८.०१.२०१६

महोदय,

संदर्भाधीन शासन पत्रासोबत श्री. योगेश केणी, अध्यक्ष भ्रष्टाचार एवं अपराध निवारक परिषद यांचे दि.२.०१.२०१६ रोजी चे पत्र कार्यवाहीकरीता जोडलेले आहे. सदर पत्रामध्ये शाळेत व कॉलेज मधील मुले ही गैरहजर राहिल्याची माहिती पालकांना मोबाईलवर एस.एम.एस. व्दारे दयावी ' अशी विनंती करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक भाग (उपस्थिती, परिक्षा इ.) आपल्या अखत्यारित असल्याने सदर प्रकरणी पुढील उचित कार्यवाही आपल्या स्तरावरुन करुन, त्याबाबतचा अहवाल शासनास परस्पर पाठविण्यात यावा, ही विनंती.

आपला

(डॉ सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सोबत :संदर्भाधीन शासन पत्र(सहपत्रांसह)

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीकरीता सादर
२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना आपल्या स्तरावरुन निर्देशित करण्यात यावे.
३) कार्यासन अधिकारी, का.क्र.१० यांना माहितीकरीता.